सकाळ

# विद्यार्थ्यांच्या कौशल्याला मिळाली चालना

## शिंदे अभियांत्रिकीत स्मार्ट स्पार्क स्पर्धेत महाराष्ट्र, कर्नाटकातील ७० जण सहभागी

गडहिंग्लज, ता. १६ : भडगाव (ता. गडहिंग्लज) येथील डॉ. ए. डी. शिंदे अभियांत्रिकी महाविद्यालयात इलेक्ट्रॉनिक्स आणि कॉम्प्युटर सायन्स विभागातर्फे स्मार्ट स्पार्क १.० स्पर्धा झाली. या माध्यमातून विविध उपकरणे बनविण्यासाठी विद्यार्थ्यांच्या कौशल्याला चालना मिळाली. महाराष्ट्र व कर्नाटकातील महाविद्यालयामधून ७० विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला.

सचिव प्रा. स्वाती कोरी अध्यक्षस्थानी होत्या. शिर्पेवाडी इलेक्ट्रोसेल कंपनीचे शाखा व्यवस्थापक मनीष कुलकर्णी परीक्षक होते. प्राचार्य डॉ. डी. व्ही. घेवडे यांनी स्वागत केले. नव्या पिढीतील तंत्रज्ञानप्रेमी आणि नवोपक्रमशील विद्यार्थ्यांना व्यासपीठ उपलब्ध करून देण्यासाठी स्पर्धा घेतल्याचे डॉ. घेवडे यांनी सांगितले. कुलकर्णी यांनी इलेक्ट्रॉनिक्स क्षेत्राचे महत्त्व, रोजगार संधीबाबत मार्गदर्शन केले. स्पर्धेनिमित्त विद्यार्थ्यांनी पोर्टेबल इन्व्हर्टर, कमी वजनाचा आणि सहज वाहून नेता येईल असा इन्व्हर्टर सादर केला होता. उत्पादन क्षेत्रात वापरता येणारा रोबोटही स्पर्धेत होता. सार्वजनिक ठिकाणी ऊर्जेचा वापर कमी करण्यासाठी उपयुक्त फूट स्टेप जनरेटर विद्यार्थ्यांनी तयार केला होता. प्रा. श्वेता भोई यांनी नियोजन केले. यावेळी सल्लागार महेश कोरी, प्रा. विरेश मठद, हेमंत करीगार, प्रा. महादेव बंदी व शिक्षक, विद्यार्थी उपस्थित होते. प्रा. इरफान त्रासगर यांनी सूत्रसंचालन केले. प्रा. अभिषेक मगदूम यांनी आभार मानले.



भडगाव : डॉ. शिंदे अभियांत्रिकी कॉलेजतर्फे आयोजित स्मार्ट स्पार्क उपक्रमाच्या उद्‌घाटनप्रसंगी स्वाती कोरी, डॉ. डी. व्ही. घेवडे, मनीष कुलकर्णी आदी उपस्थित होते.

### स्पर्धेतील विजेते...

**स्पर्धेत प्रथम अवधूत आपटे, वैष्णवी मलमकर (डॉ. शिंदे अभियांत्रिकी) व मनीष बोकरे, ओंकार यादव (व्ही. एस. एम. निपाणी), द्वितीय गणेश बोरगल्ली (एस. जे. पी. एन. निडसोशी) व राम व्हंजी, सुमित जाधव (डॉ. शिंदे पॉलीटेक्निक), तृतीय सोहन सावंत, समर्थ कुंभार (एस. जी. एम. पॉलीटेकनिक) व दर्शन बेन्डीकर, पृथ्वी गिड्ड (सी. बी. कोरे पॉलीटेक्निक चिक्कोडी) यांनी पटकाविला. त्यांना पारितोषिक देऊन गौरविले.**

# शिंदे महाविद्यालयात स्मार्टस्पार्क १.० स्पर्धा

## विद्यार्थ्यांची ७० हून अधिक उत्पादने सहभागी

**गडहिंग्लज : पुढारी वृत्तसेवा**

भडगाव (ता. गडहिंग्लज) येथील डॉ. ए. डी. शिंदे अभियांत्रिकी महाविद्यालयात इलेक्ट्रॉनिक्स आणि कॉम्प्युटर सायन्स विभागाच्या आयोजित स्मार्टस्पार्क १.० ही स्पर्धा उत्साहात पार पडली. संस्थेच्या सचिव प्रा. स्वाती कोरी अध्यक्षस्थानी होत्या. प्राचार्य डॉ. डी. व्ही. घेवडे यांनी स्वागत केले. महाराष्ट्र व कर्नाटकातील महाविद्यालयातून विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदविला. या स्पर्धेत ७० हून अधिक इलेक्ट्रॉनिक्स उपकरणे विद्यार्थ्यांनी सादर केली.



**भडगाव : येथील डॉ. ए. डी. शिंदे महाविद्यालयात प्रतिमापूजनप्रसंगी प्रा. स्वाती कोरी, डॉ. डी. व्ही. घेवडे व अन्य.**

स्वाती कोरी म्हणाल्या, स्पर्धेचा मुख्य उद्देश नव्या पिढीतील तंत्रज्ञानप्रेमी आणि नवोपक्रमशील विद्यार्थ्यांना व्यासपीठ उपलब्ध करून देणे हा होता. मनीष कुलकर्णी यांनी स्पर्धेचे प्रशिक्षण केले. तसेच, इलेक्ट्रॉनिक्स क्षेत्रात असणारे महत्त्व, रोजगार संधी व या क्षेत्रात होणारी क्रांती यावर विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. यामध्ये विद्यार्थ्यांनी अतिशय कल्पकतेने तयार केलेली उत्पादने सादर करण्यात आली.

या स्पर्धेत प्रथम क्रमांक अवधूत आपटे, वैष्णवी मलमकर (डॉ. शिंदे अभियांत्रिकी भडगाव) व मनीष बोकरे, ओंकार यादव (व्ही. एस. एम. निपाणी), द्वितीय क्रमांक गणेश बोरगल्ली (एस. जे. पी. एन. निडसोशी) व राम व्हंजी, सुमित जाधव (डॉ. ए. डी. शिंदे पॉलिटेक्निक), तृतीय क्रमांक सोहन सावंत, समर्थ कुंभार (एस.जी.एम. पॉलिटेक्निक) व दर्शन बेन्डीकर, पृथ्वी गिड्ड (सी. बी. कोरे पॉलिटेकनिक चिक्कोडी) यांनी पटकाविला. यशस्वी विद्यार्थ्यांना पारितोषिक देऊन गौरविण्यात आले. प्रा. श्वेता भोई यांनी नियोजन केले. यावेळी सल्लागार महेश कोरी, प्रा. वीरेश मठद, हेमंत करिगार, महादेव बंदी आदी उपस्थित होते. प्रा. इरफान त्रासगर यांनी सूत्रसंचालन केले. प्रा. अभिषेक मगदूम यांनी आभार मानले.

# डॉ. शिंदे कॉलेजमध्ये कार्यशाळेस प्रतिसाद

**गडहिंग्लज : पुढारी वृत्तसेवा**

भडगाव येथील डॉ. ए. डी. शिंदे कॉलेज ऑफ इंजिनिअरिंगमध्ये 'ओरिगामी आणि इंजिनिअरिंग' या विषयावर एक विशेष कार्यशाळा पार पडली. कार्यशाळेत ओरिगामी तज्ज्ञ अर्चना देसाई यांनी प्रमुख पाहुण्या म्हणून मार्गदर्शन केले.

कार्यशाळेत देसाई यांनी विद्यार्थ्यांना ओरिगामीच्या विविध तंत्रांची ओळख करून दिली. तसेच, कागदाच्या घड्या कशा प्रकारे अभियांत्रिकीच्या संकल्पनांशी जोडलेल्या आहेत, हे त्यांनी प्रात्यक्षिकासह समजावून सांगितले. कार्यशाळेत विद्यार्थ्यांनी स्वतः विविध आकर्षक कलाकृती तयार केल्या. प्राचार्य डॉ. डी. व्ही. घेवडे यांनीही मनोगत व्यक्त केले. प्रथम वर्षाच्या अभियांत्रिकी विभागाने या कार्यक्रमाचे आयोजन केले होते. यावेळी संस्थेचे सचिव स्वाती कोरी, उपप्राचार्य प्रा. के. एस. जोशी, प्रा. श्रद्धा दुंडगे, प्रा. सहिफा खान आदी उपस्थित होते.